महाराष्ट्र शासन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय किनवट जि.नांदेड**

ईमेल sdmkinwat@gmail.com

दुरध्वनी क्रमांक 02469 - 222228

जा.क्र.2024/भूसं./खा. वा./मौ. किनवट/सिआर-

शाखा - भूसंपादन

दिनांक:- 09.12.2024

**प्रति,**

कार्यकारी अभियंता,
उर्ध्वपेनगंगा प्रकल्प विभाग क्र. 4 आखाडा बाळापुर
ता. कळमनुरी जि. हिंगोली

3152
10.12.2024

**विषय:- पैनगंगा नदीवरील किनवट उच्च पातळी बंधारा ता. किनवट जि. नांदेड साठी मौ. किनवट ता. किनवट येथील खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट पध्दतीने भुसंपादन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करणेबाबत.**

संदर्भ:-
1. महसूल व वन विभागाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-03/2015/प्र.क्र.34/अ-2 दि. 12 मे 2015 व दि. 30.09.2015
2. शासन महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.एलक्युएन-01/2017/ प्र.क्र.12/अ-2दि. 25 जानेवारी 2017
3. महसूल व वन विभागाचे शासन शुध्दीपत्रक एलक्युएन-01/2017/प्र.क्र.12/अ-2 दि.28.08.2017 दि.27.09.2017 व दिनांक 27.11.2017
4. मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र क्र.2023/आरबी/डेस्क-3/भूसं/सिआर-जा.क्र. 7 दिनांक 02/01/2024
5. उपअधिक्षक, भुमिअभिलेख कार्यालय किनवट यांचे संयुक्त मोजणी अहवाल क्र. 3337 दि.30.08.2024 संकलनास प्राप्त दिनांक 15.10.2024

---000---

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वये, मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचेकडून मौ. किनवट ता. किनवट जि नांदेड येथील एकूण क्षेत्र 2.90 हे.आर. जमिनीचा खाजगी वाटाघाटीद्वारे थेट पध्दतीने भुसंपादन करण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर प्रकरणात संयुक्त मोजणी आधारे **खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी करण्यासाठी** प्रस्तावाची खरेदी पूर्व जाहीर नोटीस काढण्यात आली आहे. सदर नोटीस यासोबत पाठविण्यात येत आहे. सदर जाहीर नोटीस जिल्हा माहिती अधिकारी यांचे मार्फत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वितरीत होणा-या दोन स्थानिक भाषेतील दैनिकामध्ये, तसेच आपले कार्यालयाचे /महामंडळाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन प्रसिध्दीबाबत अहवाल या कार्यालयास सादर करावा.

कावली मेघना (भा.प्र.से.)
**सहायक जिल्हाधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी किनवट**

सोबत:- जाहीर नोटीस

# कार्यकारी अभियंता, उर्ध्वपेनगंगा प्रकल्प विभाग क्र. 4 आखाडा बाळापुर ता. कळमनुरी जि. हिंगोली

## खरेदीपुर्ण जाहिर नोटीस दिनांक 09/12/2024

किनवट तालुक्यातील तमाम लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, कार्यकारी अभियंता, उर्ध्वपेनगंगा प्रकल्प विभाग क्र. 4 आखाडा बाळापुर ता. कळमनुरी जि. हिंगोली यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे किनवट ता. किनवट जि.नांदेड या शिवारातील खालील अनुसूचिमध्ये दर्शविल्याप्रमाणे जमिन धारकांच्या जमीनी **पैनगंगा नदीवरील किनवट उच्च पातळी बंधाराच्या** कामाकरीता आवश्यक आहे. सदर जमिनी महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण -03/2015/प्र.क्र.34/अ-2 दि. 12.05.2015 व दि.30.09.2015 व शासन महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.एलक्युएन-01/2017/प्र.क्र.12/अ-2 दिनांक 25 जानेवारी 2017 दिनांक 27.11.2017 मधिल खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घेण्याबाबतच्या तरतुदीनुसार खाजगी खरेदी व्यवहाराने सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी जमिन संपादन करण्याचे प्रस्तावित आहे.

खालील अनुसूचिमध्ये जमिन मालकाचे नांव, गट नं. व संपादन करण्याचे क्षेत्र प्रस्तावित आहे. संपादन क्षेत्र हे तपशिलवार संयुक्त मोजणी अहवालानुसार विचारात घेण्यात आलेले आहे. सदर जमीनीबाबत मालकाच्या हिश्यावर हक्क, हितसंबंध, दत्तक पत्र, वारसा हक्क, गहाण, दान, बोजा, बाकी, लिज, कर्ज, बक्षिसपत्र, जप्ती, मदार व इतर हक्क असल्यास जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 10 दिवसाच्या आत पुराव्यासह लेखी तक्रार कार्यालयीन वेळेत (सकाळी 9.45 ते सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत) समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने इकडील कार्यालयास ( उपविभागीय अधिकारी, किनवट ता. किनवट जि. नांदेड ) यांना देण्यात यावी. मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहु जमीन मालकांची मिळकत निर्वेध व निर्जखीम असल्याचे समजुन कार्यकारी अभियंता, उर्ध्वपेनगंगा प्रकल्प विभाग क्र. 4 आखाडा बाळापुर ता. कळमनुरी जि. हिंगोली हे पुढील खरेदीचा व्यवहार केव्हाही करतील, दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत असल्यास ती या कार्यालयास कायदेशिररित्या बंधनकारक राहणार नाही, याची सर्व लोकांनी नोंद घ्यावी.

करिता हे खरेदीपुर्व जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

**कार्यकारी अभियंता,**
**उर्ध्वपेनगंगा प्रकल्प विभाग क्र. 4 आखाडा बाळापुर**
**ता. कळमनुरी जि. हिंगोली**

**सहायक जिल्हाधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी किनवट**

# अनुसूची

## पैनगंगा नदीवरील किनवट उच्च पातळी बंधाराच्या लागणारी खाजगी जमीन प्रस्तावित संपादन क्षेत्राचा तक्ता

गावाचे नावः- किनवट तालुका- किनवट जिल्हा- नांदेड

| अ.क्र. | संयुक्त मोजणी प्रमाणे कब्जेदाराचे नांव | सर्वे नं./ गट क्र. | भूधारणा पध्दती | संयुक्त मोजणीनुसार संपादीत होणारे क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| 1 | अकबर खान इसाखान, इसाखान सरदार खान, इम्रान खान इसाखान **सामाईक** | 301 | जिरायत | 1.48.50 |
| | **एकुण** | | | 1.48.50 |

कार्यकारी अभियंता,
उर्ध्वपेनगंगा प्रकल्प विभाग क्र. 4 आखाडा बाळापुर
ता. कळमनुरी जि. हिंगोली

सहायक जिल्हाधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी किनवट